MHWS080004782024

**दि.कि.अर्ज क्रं. ३९/२०२४ मधील नि.क्र.३३ वरील आदेश**

गैरअर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज अर्जदार सा.क्र.०२ यांच्याबाबत त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही चा आदेश रदद होउन अर्जदार सा.क्र.०२ चा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** अर्जातील गैरअर्जदार यांचे कथनानुसार, अर्जदार तर्फे सा.क्र.०२ प्रियंका रमेश चव्हाण यांचे पुराव्यावर गैरअर्जदाराविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश झालेला असून सदरचा साक्षीदार या कामातील महत्वाचा साक्षीदार असून प्रकरणाच्या योग्य त्या कार्यवाही व निकालाकरीता सदर साक्षीदाराचा उलटतपास घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सदर साक्षीदारास पुन्हा उलटतपासाकरीता न बोलवल्यास गैरअर्जदाराचे कधीही न भरुन येणारे नुकसार होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर अर्जदाराचे लेखी म्हणणे मागविण्यात आले. अर्जदाराचे म्हणण्यानुसार, गैरअर्जदाराने प्रकरण प्रलंबित ठेवण्याकरीता व अर्जदाराला उशिराने न्याय मिळावा या हेतूने सा.क्र.०२ तीन तारखांना हजर होउन सुध्दा तिचा साक्षीपुरावा घेतलेला नाही. त्यामुळे यापूर्वी गैरअर्जदार यांना ५००/— रुपये दंड आकारण्यात आलेला आहे. तो देखील त्यांनी अर्जदारास दिलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करावा व जास्तीत जास्त दंड आकारावा अशी विनंती केली.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट, १८२७ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी अर्जदाराचा पुरावा नि.क्र.१६ वर पुर्ण झालेला असून अर्जदारातर्फे साक्षीदार यांचा पुरावा नि.क्र.२८ वर दाखल करण्यात आलेला आहे. त्यानंतर नि.क्र.२९ वरील गैरअर्जदाराचे मुदतीचे अर्जावर र.रु.५००/— इतका दंड आकारुन सदर दंडाची रक्कम अदयाप गैरअर्जदारातर्फे जमा केल्याचे दिसून येत नाही. गैरअर्जदार यांच्या दृष्टिने अर्जदार क्र.०२ या साक्षीदाराचा उलटतपास महत्वाचा असल्याचे अर्जात नमूद केलेले आहे. मूळ अर्जाचे स्वरुप पाहता गैरअर्जदाराचे

सदर कथनात तथ्य आढळते. परंतु गैरअर्जदार यांनी यापूर्वी उलटतपासाकरीता झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर निश्चीत करण्यात आलेल्या दंडाची रक्कम भरल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे यापूर्वीची दंडाची रक्कम व सदर अर्ज देण्यास झालेलया विलंबाबाबच्या ठराविक दंडावर अर्ज मंजूर करणे आवश्यक असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१ गैरअर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.३३ मंजूर करण्यात येतो.

२ गैरअर्जदार यांना अर्जदारातर्फे सा.क्र.०२ चा उलटतपास घेण्यास झालेला विलंब त्यांनी रक्कम रू. ५००/— चा दंड अर्जदारांना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. गैरअर्जदार यांनी यापूर्वी आदेशित केलेल्या दंडाची रक्कम ५००/— व या अर्जावरील दंड र.रु. ५०० असा एकूण दंड र.रु.१०००/— जमा केल्यानंतर अर्जदारतर्फे सा.क्र.०२ यांना पुन्हा पुराव्याचे कामी बोलावून उलटतपास नोंदवावा.

PRATAP VISHNU SAPKAL Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL Date: 2025.08.06 17:08:55 +0530

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — ०६.०८.२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०६.०८.२०२५ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०६.०८.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०६.०८.२०२५ |